# प्रारंभिक अधिसुचना

भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
मुल यांचे कार्यालय
क्र.कावि /उविअ/भुसंपा/गो.प्र/अ.का/824/2021
दिनांक :- 03/12/2021

भुमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 अन्वये कलम 11 ( 1) खालील अधिसुचना.

**भु.प्र क्रमांक 24 / एलए-65/2021-22 मौजा- पाथरी , तालुका- सावली, जिल्हा- चंद्रपूर**

ज्याअर्थी,भुमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013(2013 चा 30) याच्या कलम-3 च्या (खंड) (ई) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून,काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना,महसुल व वन विभाग क्र,संकिर्ण दिनांक 11/2014/प्र.क्र 77/अ-2 दिनांक 19 जानेवारी 2015 ( यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे )याद्वारे असे अधिसूचित केले आहे की,उक्त अधिनियमाच्या कलम-3 च्या खंड ( झेड-अे ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील 500 हेक्टरपेक्षा जास्त नसेल इतक्य क्षेत्रातील जमीन संपादन करण्याच्या संबंधात,अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी,उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या,चंद्रपूर जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन ( यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमिन असा करण्यात आला आहे )सार्वजनिक प्रयोजनाकरिता (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे )आवश्यक आहे.अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते,ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम-11 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये असे अधिसुचित करण्यात येते की उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी,प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे,यासोबत जोडलेल्या अनुसुची तीनमध्ये दिलेली आहेत.( विस्थापन होणारे असेले तर या अनुसुचीमध्ये कारणे नमुद करावी.

आणि ज्याअर्थी सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी,कलम-43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल,यासोबत जोडलेल्या अनुसुचित पाचमध्ये दिलेला आहे.( नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसुचीमध्ये तपशिल नमुद करावा )

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की उक्त अधिनियमाच्या कलम-11 च्या पोट कलम-4 अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या सुट देता येईल.

परंतु आणखी असे की,कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीने बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीचा किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम-11 च्या पोट कलम(5) अनुसार जिल्हाधिकारी भुमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क ( महाराष्ट्र ) नियम-2014(यापुढे ज्यांच्या निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे)यांच्या नियम-10 च्या उपनियम(3) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भुमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम-3 च्या खंड(छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाध्किारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,मुल जि चंद्रपूर यास पदनिर्देशित करित आहे.

## अनुसुचि एक
## जमीनीचे वर्णन

**भू.प्र.क्रं 24 /एल-65/2021-22**

गांव :- **पाथरी** तालुका- सावली, जिल्हा- चंद्रपूर

| अ.क्र | सर्व्हे क्र किंवा गट क्र. | 7/12 प्रमाणे एकूण क्षेत्र ( हे आर ) | संपादनाखालील क्षेत्र (अंदाजे ) हे.आर मध्ये |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 633 | 0.56 | 0.01 |
| 2 | 634 | 1.59 | 0.01 |
| 3 | 643 | 0.71 | 0.01 |
| 4 | 629 | 0.90 | 0.01 |
| | **एकूण बेरीज =** | **3.76** | |

## अनुसुचि- दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

प्रकल्पाचे नांव :- गोसीखुर्द प्रकल्प

प्रकल्प कार्याचे वर्णन :- आसोला मेंढा मूख्य कालव्यावरील सा.क्र.890 मी. वरून निघणा-या पाथरी लघूकालवा क्र.-1 कालव्यावरील पाथरी लघूकालवाच्या बांधकामाकरीता

## अनुसुचि-तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- विस्थापित होत नाही.

## अनुसूचि- चार

सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या. सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांशा :- गोसीखुर्द प्रकल्प महाराष्ट्र यास भारत सरकार पर्यावरण एंव वनमंत्रालय नई दिल्ली यांचे पत्र क्र. N0-J-11016 (7 )/ 84-EN.5/1Aदिनांक 3 फेब्रुवारी1988 नुसार पर्यावरण आघात निर्धारण झालेले असल्यामुळे सामाजिक आघात निर्धारण बाबतची तरतुद लागू होत नाही.

## अनुसचित-पाच
## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| अ. प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यास आलेल्या अधिका-याचे पदनाम | :- | निरंक |
| ब.प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :- | निरंक |
| क.ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकीची नियमुक्ती करण्यात आली त्या अधिसुचनेचा तपशिल | :- | निरंक |

ठिकाण:- मुल
दिनांक :- 03/12/2021

(एम. खेडकर )
उपविभागीय अधिकारी
तथा भुसंपादन अधिकारी, मुल